MHYA070020202024

**फौ. कि. अर्ज क्र. २१/२०२४**

सौ. अलका –वि– विजय

**निशाणी क्र.११ खालील आदेश**

**(दिनांक ०३/०८/२०२६)**

०१. अर्जदार हिने अर्ज हा भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ कलम १४४ नुसार दाखल केला आहे. त्यात तिने प्रस्तुतचा अर्ज अंतरिम पोटगीच्या मागणीसाठी दाखल केला आहे.

०२. **अर्जदाराचे अर्जातील थोक्यात कथन असे की,**

अर्जदार क्र.१ हिचे लग्न गैरअर्जदार सोबत हिंदू रितीरिवाजा प्रमाणे दिनांक ३०/०५/२०१० रोजी वधु मंडपी मौजा धनगरवाडी, ता.दारव्हा येथे झाला होता. विवाहसंबधातून दिनांक १०/०७/२०११ रोजी अर्जदार क्र.२ मुलगी नामे नेहलचा व दिनांक २३/०१/२०१३ रोजी अर्जदार क्र.३ मुलगा नामे विवेकचा जन्म झाला. त्यानंतर अर्जदार क्र.१ हिस मानसिक व शारीरिक त्रास देणे सुरु केले. वरचेवर अर्जदार क्र.१ हिचा अश्लील शब्दात बोलून अपमान करणे, मारहाण करणे चालु केले. गैरअर्जदार हा अर्जदार क्र.१ ला घटस्पोटाची मागणी करीत होता. तसेच गैरअर्जदाराने दुस–या विवाहित स्त्रीला रखेल म्हणून घरात ठेवले व अर्जदार यांना मारहाण करुन घराबाहेर हाकलून दिले. त्यामुळे अर्जदार क्र.१ ला नाइलाजास्तव माहेरी यावे लागले.

०३. अर्जदार व तिचे दोन लहान मुले या तिघांची उपजिवीका करण्यास अर्जदार हिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार याच्याकडे दोन खंडी बक–या आहे. त्यापासून त्याला दरमहा ५० हजार रूपये उत्पन्न मिळवतो. म्हणुन गैरअर्जदार हा अर्जदार क्र.१, २ व ३ ला एकत्रित २५,०००/– रुपये प्रतिमहा खावटी देण्यास समर्थ आहे व तशी ऐपत देखील आहे. सदर अर्जात निकाल लागेपर्यंत गैरअर्जदारांकडुन अंतरिम स्वरुपात पोटगी एकत्रित २५,०००/– रुपये प्रतिमहा देण्याचा अंतरीम आदेश व्हावा अशी विंनती अर्जदार क्र.१ हिने केली आहे.

०४. गैरअर्जदाराने निशाणी क्र.१२ वर अर्जदाराच्या तात्पुरत्या मनाई हुकुमाच्या अर्जास उत्तर दिले. गैरअर्जदार यांनी त्याच्या जबाबात कथन केले की, त्याने अर्जदार हिला व दोन मुलांना कोणत्याही प्रकारचा त्रास दिला नाही. अर्जदार क्र.३ विवेक हा गैरअर्जदार यांच्याकडेच राहत असून त्याचा सर्व खर्च गैरअर्जदार हाच करीत आहे. अर्जदार क्र.२ नेहल हिचा सुद्धा सर्व खर्च गैरअर्जदार यांनाच करावा लागत आहे. गैरअर्जदाराकडे कोणत्याही प्रकारच्या बक–या नाही व तो कोणत्याही प्रकारचा बक–याचा व्यवसाय करीत नाही. गैरअर्जदार हा आजारी राहत असल्यामुळे त्याच्याकडून कोणताही कामधंदा होत नाही. तसेच गैरअर्जदार याचे वडील यांना पॅरालीसीसचा अटक आला असल्यामुळे व गैरअर्जदाराची आई यांना ह्यदय विकाराचा झटका येवून गेला असल्यामुळे त्यांना नेहमी उपचार घ्यावा लागतो. अर्जदार क्र.१ हिने सदरची खोटी तक्रार गैरअर्जदाराविरुद्ध दिली आहे.

०५. अर्जदार क्र.१ ही विविध महिला बचत गटांचे काम करते. तसेच शिवनकामसुद्धा करते. त्यातून तिला दर महिन्याला १५ ते २० हजार रूपये

उत्पन्न मिळवते. अर्जदार ही माहेरी राहत असताना एकटीच वर्षातून ५ ते ६ हिने पुणे किंवा मुंबई येथे जावून काम करते. या उलट गैरअर्जदार हा कोणतीही कमाई करीत नाही. गैरअर्जदार हा भूमिहीन व निराधार आहे. तसेच गैरअर्जदारावर त्याचे आई–वडीलांची जबाबदारी आहे. त्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदार यांना खावटी देण्यास असमर्थ आहे. याउलट अर्जदार ही स्वतःच्या मर्जीने माहेरी राहत असल्यामुळे अर्जदार क्र.१ ते ३ यांना एकत्रित २५,०००/– रुपये प्रतिमाह खावटी मागण्याचा कोणताही अधिकार नाही असे सांगून गैरअर्जदार यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०६. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अर्ज, जबाब व प्रकरणात दाखल असलेली सर्व कागदपत्रांची पाहणी केली. गैरअर्जदाराने लग्नसंबंध नाकरले नाही. त्यामुळे, अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये कौटूंबिक नाते आज देखील कायम आहेत. पोटगीचा अर्ज विचारात घेताना अर्जदार ही तिचे व तिच्या दोन मुलांचे पालनपोषण करण्यास असमर्थ आहे ही बाबी पाहणे आवश्यक आहे. अर्जामध्ये अर्जदार ही कामधंदा करीत नसल्याचे कथन केले आहे. याउलट गैरअर्जदार कोणताही कामधंदा करीत नाही व कोणतेही उत्पन्न नाही असे कथन सादर केले आहे. वास्तविक पाहता अर्जदार यांनी गैरअर्जदार यांच्या उत्पन्नासंबंधी व स्थावर मालमत्तेसंबंधी कोणतेही कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेले नाही. त्याचप्रमाणे गैरअर्जदार यांनीदेखील अर्जदार हिचे उत्पन्नाचे व स्थावर मालमत्तेसंबंधी कोणतेही कागदपत्र अभिलेखावर दाखल केले नाही. अशा परिस्थितीत अर्जदाराच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदार कमावितो असे म्हणता येणार नाही.

०७. अर्जदार हिने स्वतःसाठी व तिच्या दोन मुलांसाठी गैरअर्जदारकडून अंतरीम खावटी मागितलेली आहे. अर्जदार ही गैरअर्जदार यांची पत्नी आहे व त्यांची दोन मुले आहे हे गैरअर्जदाराला कबूल आहे. परंतु एक मुलगा गैरअर्जदाराकडे आहे असे त्याचे कथन आहे. अर्जदाराचे कथन आहे की, तो मुलगा तिच्याकडे आहे. अशा परिस्थतीत तो मुलगा कोणाकडे आहे हे पुराव्याअंती निश्चित होईल. आजरोजी हे निश्चित होणार नाही. जरी अर्जदार व तिची एक मुलगी नेहल हिचा विचार केला तरी गैरअर्जदार यांनी पती व वडील म्हणून त्यांचा सांभाळ करणे आवश्यक आहे, ही त्याची नैतीक व कायदेशीर जबाबदारी आहे. गैरअर्जदार यांनी तो कामधंदा करण्यास असमर्थ आहे अशी कोणतीही परिस्थिती अभिलेखावर आणलेली नाही. त्यामुळे पत्नीच्या व मुलीच्या पोटगीची व्यवस्था करणे ही गैरअर्जदार याचे प्राथमिक कर्तव्य आहे असे माझे मत झाले आहे.

०८. सदरचा अर्ज हा अंतरीम आहे. जरी गैरअर्जदार मजुरीचे काम करत असेल असे गृहित धरले तरी प्रत्येक मजुर दर महिना १०,०००/- ते १५,०००/- रुपये कमवू शकतो. अंतिम आदेश हा पुराव्याअंती असणार आहे. सदरचा अर्ज हा पुराव्या अगोदर असल्याने प्रथमदर्शनी प्रकरण पाहून तसेच सध्याची परिस्थिती पाहाता गैरअर्जदार याने अर्जदार क्र.१ ला अंतरिम पोटगी म्हणुन दरमहा २,०००/- रुपये, अर्जदार क्र.२ ला दरमहा २,०००/- रुपये दिल्यास न्यायोचित होईल असे मला वाटते. अर्जदार क्र.३ साठी अंतिम निकालाप्रमाणे आदेश राहिल. सदरचे प्रकरण दिनांक २७/०९/२०२४ रोजी दाखल झाले आहे. यादरम्यानच्या काळात गैरअर्जदाराने अर्जदारांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था केल्याबाबत कुठलाही पुरावा दाखल केला नाही. त्यामुळे,

सदरची रक्कम अर्ज दाखल तारखेरपासून देणे न्यायवाजवी ठरेल. सबब मी खालील आदेश पारित करत आहे.

## –:: आदेश ::–

| | |
|---|---|
| १) | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |
| २) | गैरअर्जदार याने अंतरीम पोटगी म्हणुन अर्जदार क्र.१ ला रुपये २,०००/– (दोन हजार रूपये) व अर्जदार क्र.२ ला रुपये २,०००/– (दोन हजार रूपये)  असे एकूण ४,०००/– (चार हजार रुपये) अर्ज दाखल तारखेपासून ते मुख्य अर्जाचा निकाल लागेपर्यंत देण्यात यावी. |
| ३) | अर्जदार क्र.३ साठी अंतीम निकालाचा आदेश बंधनकारक राहील. |
| ४) | गैरअर्जदार याने अर्जदार क्र.१ ला सदर अर्जाचा तात्पुरता खर्च म्हणुन रुपये १,०००/– (एक रुपये हजार) द्यावेत. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
SHRAVANTI VIJAY
RAJKUNTWAR
Date: 2026.08.03
15:29:19 +0530

दिनांकः– ०३/०८/२०२६ (श्रीमती डॉ. एस.व्ही. राजकुंटवार)

ठिकाणः– दारव्हा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दारव्हा

जि. यवतमाळ.

## प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. निकालपत्र/आदेश यामधील सर्व मजकुर मुळ निकालपत्र/आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :- | प्रफुल ध. रंगारी |
| न्यायालयाचे नाव | :- | श्रीमती डॉ. एस.व्ही. राजकुंटवार<br>सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दारव्हा, जि. यवतमाळ. |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | :- | ०३/०८/२०२६ |
| न्यायिक अधिकाऱ्यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केल्याचा दिनांक | :- | ०३/०८/२०२६ |
| निकालपत्र अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०३/०८/२०२६ |